(1) (48) (23)

Included in Ukbaktdal

# Annexure XIX(14)
(Vide Article-19.06.06)

विषय:-वन जमिनीवरील गवत कुरणाचे लिलावाबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक टिएजी १०८९/प्र.क्र.२१६१/म-११
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२
दिनांक २० ऑक्टोबर १९८९.

शासन परिपत्रक

राज्यात काही जिल्हयांत चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता विचारात घेवून शासनाने चारा निर्मितीसाठी जे विविध उपाय योजिले आहेत त्यामध्ये वन जमिनीवरील गवत टंचाई ग्रस्त भागातील शेतक-यांना पुरविणे ही एक योजना आहे आणि हे गवत उपलब्ध व्हावे म्हणून शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार वन विभागाच्या व इतर विभागाच्या गवत कुरणांचे लिलाव संबंधित जिल्हाधिका-यांशी विचार विनिमय करून करण्यात यावे, अशा प्रकारचे आदेश सर्व संबंधित वन संरक्षक यांना देण्यात आलेले आहेत.

२. तथापि टंचाई संदृश्य परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी जिल्हाधिकारी हे वन जमिनीतील कुरणांचा लिलाव करण्यास वेळीच परवानगी देत नाहीत. त्यामुळे वनकुरणांच्या लिलाव खरेदीस कोणी येत नाही आणि पर्यायाने शासनास महसूलास मुकावे लागते.

३. वरील प्रश्न हा शासनाचे विचाराधीन होता, विचाराअंती या प्रश्नावर खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

राज्यात सर्वसाधारण माहे जून मध्ये पावसाला सुरुवात होते. जुन व जुलै या दोन महिन्यात सरासरीच्या निम्मा पाऊस पडतो. अशा परिस्थितीत वनकुरणांचा लिलाव करण्यास "नाहरकत प्रमाणपत्र" देण्यास हरकत असू शकत नाही. परंतु जिल्हाधिकारी वेळेवर प्रमाणपत्र देत नाहीत म्हणून आता असे आदेश देण्यात येत आहेत की, जून-जुलै मध्ये पडलेल्या पावसाचा अंदाज घेऊन आणि पिक परिस्थितीचा विचार करून विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील सर्व जिल्हयांबाबत वन विभागाकडील कुरणांचा लिलाव करावयाचा अगर कुरणे राखून ठेवायची याबाबत "नाहरकत प्रमाणपत्र" जुलै महिन्याच्या अखेरीस संबंधित वनसंरक्षक यांना द्यावेत. तसेच वनसंरक्षक यांनी लिलावाचे शर्तीत अशी एक अट घालावी की, चा-याची टंचाई निर्माण झाल्यास प्रत्येक ठेकेदाराने ठराविक टक्केवारीनुसार किंवा ५० टक्केचारा शासनास चारा टंचाई निवारणासाठी शासनाने मंजूर केलेल्या दराने किंवा ठेकेदारास लिलावात झालेल्या खर्चाचा विचार करुन वनसंरक्षक यांनी ठरविलेल्या दराने द्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

स्वा/-

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

क्रमांक:-कक्ष-११/गवत /२५/८७-८८/ १२०६/८९-९०
नागपूर-४४० ००१, दिनांक :- २९-११-८९

प्रतिलिपी :-

१. वनसंरक्षक (सर्व)

२. विभागीय वन अधिकारी (सर्व)

यांना माहिती व जरुरी त्या कार्यवाहीसाठी

रवाना.

विशेष कार्य अधिकारी,
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
महाराष्ट्र राज्य,
नागपूर.

...

संप्रदे२८११८९